नियमीत दिवाणी दावा क्र. १०/२०२१
रामचंद्र वि. परशुराम

## निशाणी क्र. ३८ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने अतिरीक्त वाद मुद्दे निश्चीत करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादीने कैफियतीमध्ये केलेल्या कथनानुसार दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते का? आणि वादी व प्रतिवादी यांच्यावर त्यांच्यामध्ये दि. १६/११/२०१३ रोजी दावा मिळकतीबाबत झालेला करार बंधनकारक आहे का? या संबंधी अतिरीक्त मुद्दे निश्चीत करणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादीने आपले म्हणणे दाखल करून प्रस्तुतचा अर्ज केवळ वेळकाढुपणा करुन वादीचा उलटतपास घेण्यास टाळाटाळ करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. कैफियतीमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या कराराची प्रत प्रकरणात दाखल करण्यात आलेली नाही. तसेच, कैफियतीत उल्लेख करण्यात आलेली नोटीस अभिलेखावर दाखल करण्यात आलेली नाही. याकारणास्तव वादीने प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. डी. एन. पाटील आणि वादीतर्फे विद्वान वकील श्री. बी. जी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्र आणि निशाणी क्र. १४ कडील कैफियत यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, कैफियतीमध्ये दावा मुदतबाह्य असल्याबाबत आणि दि. १६/११/२०१३ रोजीच्या

कराराबाबत कथने करण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचा निकाल गुण अवगुणावर लागण्यासाठी उपरोक्त मुद्दे निश्चित करणे आवश्यक आहे, या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे  दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते का? आणि वादी व प्रतिवादी यांच्यावर त्यांच्यामध्ये दि. १६/११/२०१३ रोजी दावा मिळकतीबाबत झालेला करार बंधनकारक आहे का? या संबंधी अतिरीक्त मुद्दे निश्चीत करण्यात येतो.

३. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

सही/-

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ३०/११/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरुड